# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र. २२ दिनांक ०३/०३/२०२१

**मनोर पोलीस ठाणे हद्दीतील मुंबई अहमदाबाद महामार्गावर रिक्षा चालक पुंडलिक आनंदा पाटील, वय ३० वर्षे, रा. वसई, जि.पालघर याचा निर्घुणपणे खुन करणा-या आरोपींना निष्पन्न करुन खुनाचा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलीसांना यश**

---------------------------------------------------------------------

दिनांक १८/०२/२०२१ रोजी ००.१५ वाजताचे पुर्वी मौजे ढेकाळे गावचे हद्दीत मुंबई अहमदाबाद महामार्गावर, गुजरात वाहिनीलगत कोणीतरी अज्ञात आरोपींनी, अज्ञात कारणावरुन मयत यास डोक्याचे पाठीमागील बाजुस कोणत्यातरी धारदार हत्याराने/शस्त्राने वार करुन त्यास जिवेठार मारुन मृतदेह ॲटो रिक्षा क्रमांक एम.एच.४८/बी.एफ़.९१६४ मध्ये पाठीमागील सिटच्या खाली मधल्या जागेमध्ये ठेवुन रिक्षा रोडच्या बाजुला नाल्यात कलंडवुन ठेवलेबाबत दिलेल्या फ़िर्यादीवरुन मनोर पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक २९/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३०२ प्रमाणे दिनांक १८/०२/२०२१ रोजी ०४.५० वाजता गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हयाचा तपास श्री. विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग यांचेकडे सुपुर्द केल्यानंतर त्यांनी तपास हाती घेवुन गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा.पोलीस अधीक्षक, पालघर व अपर पोलीस अधीक्षक, पालघर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वप्रथम मनोर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी तपास पथके तयार करुन, सदर पथकास तपासकामी सुचना व मार्गदर्शन करुन तपास पथके वेगवेगळ्या परिसरात रवाना केलेली होती.

सदर पथकातील अधिकारी व अमंलदार यांनी सर्वप्रथम गुन्हा घडलेल्या ठिकाणी भेट देऊन घटनास्थळाची पाहणी करुन तपास सुरु केला. मयत इसमाची माहीती प्राप्त करुन गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने सखोल तपास केला असता, मयताच्या पत्नीचे एका अटक आरोपी सोबत अनैतिक प्रेम संबध असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन तपासाला गती देऊन विविध ठिकाणच्या साक्षीदारांची तपासणी केली. झालेल्या सखोल तपासाच्या आधारावरती एका संशयीत आरोपीस निष्पन्न करुन त्याचेकडे कसुन चौकशी केली असता, त्याने गुन्हा केल्याची कबुली देऊन इतर आरोपींबाबत माहीती दिली. त्यावरुन सदर गुन्हयात एकुण ५ आरोपींना ताब्यात घेऊन अटक करण्यात आली आहे.

प्राथमिक तपासादरम्यान मयताच्या पत्नीचे एका आरोपी सोबत अनैतिक प्रेम संबध असल्याच्या कारणावरुन मयत हा त्याच्या पत्नीला तिचे अनैतिक प्रेम संबधाबाबत वारंवार विचारणा करत होता. त्याचा राग मनात धरुन प्रेमसंबध असलेल्या अटक आरोपीसोबत मयत याचे पत्नीने संगणमत करुन इतर ३ आरोपींच्या मदतीने कट रचुन मयताच्या रिक्षातुन प्रवास करतांना प्रवासादरम्यान मयत याचे डोक्यात लोखंडी रॉड ने उपट मारुन त्याचा खुन केला. त्यानंतर त्याचे प्रेत

रिक्षाच्या पाठीमागील शिटवर ठेऊन ती रिक्षा रस्त्यालगत असलेल्या नाल्यात पलटी करुन पळुन गेल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारचे धागेदोरे नसतांना कौशल्यपुर्ण गुन्हयाचा तपास करुन गुन्हयात एकुण ०५ आरोपी निष्पन्न करुन गुन्हा उघडकीस आणण्यात पोलीसांना यश आलेले आहे. तसेच गुन्हयात निष्पन्न झालेल्या आरोपींपैकी ०२ आरोपी वसई पोलीस ठाणे येथे कार्यरत आहेत.

सदर गुन्हयाच्या तपासात श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक,पालघर यांचे मार्गदर्शनाखाली श्री.विकास नाईक उप विभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग, सपोनि/श्री.प्रताप दराडे, प्रभारी अधिकारी मनोर पोलीस ठाणे, सपोनि/श्री.श्रीकांत कोळी, पोउनि/श्री.अजित कणसे, पोउनि/श्री. आशिष पाटील,स्थानिक गुन्हे शाखा,पालघर, पो.ना./१४८४ संदीप कदम, पो.ना./१५२३ शिवाजी भोईर, पो.ना./१३९८ उत्तम बिरारी, म.पो.हवा./६३२ देहेरकर, पो.शि./३५९ सचिन गोल्हे, पो.शि./१७११ उदय चौधरी सर्व नेम.मनोर पोलीस ठाणे, स.फौ./वाघ,पो.हवा/निकोळे पो.हवा/राउत, पो.हवा/निरज शुक्ला पो.ना/नरेंद्र पाटील,पो.ना/विजय ठाकूर, पो.ना./कैलास पाटील सर्व नेम. स्थानिक गुन्हे शाखा, पालघर पोहवा/मानिक कर्डीले, पोशि/रेड्डी, नेम.उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, पालघर विभाग यांनी चांगली कामगीरी केलेली आहे.